<u>**कुलाबा-वांद्रे-सीप्झ मुंबई मेट्रो-३ मार्गिका**</u>

MMRC

**मेट्रो-३च्या भुयारीकरण पूर्णत्वासाठी केवळ ९ टप्पे बाकी**

मुंबई,ऑक्टोबर ७, २०२० - मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन (मुं.मे.रे.कॉ) द्वारे मेट्रो-३ मार्गाचे भुयारीकरण पूर्ण करण्यासाठी भुयारीकरणाचे केवळ ९ टप्पे गाठणे बाकी आहेत. उर्वरित भुयारीकरण पॅकेज १,३,४ व ६ या अंतर्गत पूर्ण होणार आहे. मेट्रो-३ द्वारे होणाऱ्या भुयारीकरणाचा तपशील पुढील प्रमाणे-

| **भुयारीकरणाचा टप्पा** | **भुयारीकरणाचा टप्पा (स्थानक)** | **स्थळ** | **लाइन अप/डाउन** | **एकूण लांबी (मीटर)** |
|---|---|---|---|---|
| ३३ वा | चर्चगेट ते हुतात्मा चौक | हुतात्मा चौक | अपलाईन | ६४९ |
| ३४ वा | सिध्दीविनायक ते दादर | दादर | डाउनलाईन | ११२६ |
| ३५ वा | सहार रोड ते सीएसएमआयए आंतरदेशीय | सीएसएमआयए आंतरदेशीय | अपलाईन | १५१६ |
| ३६ वा | हुतात्मा चौक ते सीएसएमटी | सीएसएमटी | अपलाईन | ५५१ |
| ३७ वा | चर्चगेट ते सीएसएमटी | सीएसएमटी | डाउनलाईन | १२३३ |
| ३८ वा | सायन्स म्युझियम ते महालक्ष्मी | महालक्ष्मी | अपलाईन | १११८ |
| ३९ वा | सायन्स म्युझियम ते महालक्ष्मी | महालक्ष्मी | डाउनलाईन | ११३६ |
| ४० वा | महालक्ष्मी ते मुंबई सेंट्रल | मुंबई सेंट्रल | अपलाईन | ८३७ |
| ४१ वा | महालक्ष्मी ते मुंबई सेंट्रल | मुंबई सेंट्रल | डाउनलाईन | ८३० |

आतापर्यंत ३२ टप्पे पूर्ण झाले असून ते पॅकेज २,५,७ अंतर्गत आहेत. एकूण ५४.५ कि मी पैकी ४८ कि मी इतके भुयारीकरण पूर्ण झाले आहे .

याविषयी बोलताना मुं.मे.रे.कॉचे संचालक (प्रकल्प) श्री. सुबोध गुप्ता म्हणाले," मेट्रो-३मार्ग अत्यंत मुंबईतील दाटीवाटीची वस्ती, जुन्या इमारती , ऐतिहासिक वारसा तसेच उत्तुंग इमारती, उड्डाणपुल, मेट्रो मार्ग व रेल्वे मार्गाखालून जात असल्याने येथे भुयारीकरण करणं आव्हानात्मक आहे . मेट्रो-३ सारख्या क्लिष्ट प्रकल्पासाठी एकूण १७ टनेल बोरिंग मशीन एकाच वेळेला कार्यरत असण्याची भारतात कदाचित ही पहिलीच वेळ असेल". (समाप्त)

For further information please contact: -

Vaidehi More
9028543087
vaidehi.more@mmrcl.com

Niti Tamse
8369727364/9664215544
niti.tamse@mmrcl.com